दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष ६ वे || अंक ५२ || मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## भारतरत्नांची पुण्यभूमीः दापोली – डॉ. भारत कऱ्हाड

रत्नागिरी जिल्ह्यातील कोकण किनाऱ्यावर वसलेले दापोली हे भौगोलिकदृष्ट्या छोटे असले तरी भारतीय सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक इतिहासात त्याचे स्थान अत्यंत मानाचे आहे. मर्यादित क्षेत्रातून भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्राप्त केलेल्या तीन महान व्यक्तींचा संबंध या भूमीशी जोडला जातो, ही बाब दापोलीच्या संस्कारसंपन्न परंपरेची साक्ष देते. त्यामुळे दापोलीचा विचार केवळ पर्यटन स्थळ म्हणून न करता, सामाजिक परिवर्तन आणि बौद्धिक परंपरेचे केंद्र म्हणून करणे आवश्यक ठरते.

अरबी समुद्राच्या सान्निध्यात आणि सह्याद्रीच्या कुशीत वसलेले दापोली आपल्या आल्हाददायक हवामानासाठी ओळखले जाते. प्राचीन काळातील मानवी वस्तीचे पुरावे पन्हाळेकाजी येथील बौद्ध लेण्यांतून आढळतात. इतिहासाच्या विविध टप्प्यांमध्ये शिलाहार, यादव, मुस्लिम सत्ताधीश, मराठे आणि ब्रिटिश अशा विविध राजसत्तांनी या प्रदेशावर राज्य केले. ब्रिटिश काळात येथे लष्करी छावणी उभारली गेली आणि त्यातून शिक्षण व प्रशासनाची पायाभरणी झाली. परिणामी दापोलीमध्ये ज्ञान, शिस्त आणि सामाजिक जागरूकतेचे वातावरण विकसित झाले.ङदापोलीशी संबंधित भारतरत्नांचा विचार केला तर महर्षी धोंडो केशव कर्वे हे स्त्री शिक्षण आणि विधवा पुनर्विवाह चळवळीचे अग्रदूत म्हणून भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणणारे महान समाजसुधारक ठरतात. मुरुड येथे जन्मलेल्या कर्वे यांच्या कार्यामुळे भारतीय स्त्रीच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला. त्यांना १९५८ मध्ये भारतरत्न प्रदान करण्यात आले. त्यानंतर महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे यांनी संस्कृत, धर्मशास्त्र आणि प्राच्यविद्या क्षेत्रात केलेल्या संशोधनामुळे जागतिक कीर्ती मिळवली. त्यांच्या 'धर्मशास्त्राचा इतिहास' या ग्रंथाला आजही विद्वान संदर्भग्रंथ म्हणून मान्यता देतात आणि त्यांच्या विद्वत्तेच्या गौरवार्थ १९६३ मध्ये त्यांना भारतरत्न प्रदान करण्यात आले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे मूळ गाव आंबवडे ऐतिहासिकदृष्ट्या दापोलीच्या प्रशासकीय परिघात येत होते आणि



त्यांनी बालपणातील काही काळ येथे व्यतीत केला. सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांच्या स्थापनेत त्यांच्या योगदानामुळे त्यांना १९९० मध्ये भारतरत्न बहाल करण्यात आले.ङया भूमीने अनेक नामवंत व्यक्तिमत्त्वांना घडवले आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे चिखलगाव, साने गुरुजींचे पालगड, साहित्यिक श्री. ना. पेंडसे व गो. नी. दांडेकर, पद्मश्री दादासाहेब इदाते आणि नेपथ्यकार नितीन देसाई यांची कार्यगाथा या प्रदेशाच्या वैचारिक संपन्नतेची साक्ष देते. ए. जी. हायस्कूलसारख्या शैक्षणिक संस्थांनी आणि पुढे स्थापन झालेल्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने या ज्ञानपरंपरेला बळकटी दिली.ङदापोलीचा सांस्कृतिक वारसा देखील तितकाच वैभवशाली आहे. हर्णैजवळील सुवर्णदुर्ग हा मराठा नौदलाच्या सामर्थ्याचा साक्षीदार आहे. पन्हाळेकाजी येथील लेणी, आंजर्लेचा कड्यावरचा गणपती, आसूदचे केशवराज मंदिर, केळशीची महालक्ष्मी आणि परिसरातील इतर प्राचीन देवस्थाने धार्मिक परंपरेची समृद्ध परंपरा दर्शवतात. लाडघर येथील तांबड्या वाळूचा समुद्रकिनारा आणि निसर्गरम्य परिसर दापोलीच्या पर्यावरणीय वैशिष्ट्यांना अधोरेखित करतात.ङकालांतराने दापोली हे छोटे किनारी गाव शिक्षण, संशोधन आणि पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. कोकण कृषी विद्यापीठामुळे कृषी संशोधन आणि स्थानिक विकासाला चालना मिळाली असून राज्यभरातून येणारे विद्यार्थी आणि संशोधक येथे ज्ञानार्जन करतात. अनेकांना या भूमीचे वातावरण इतके भावते की ते येथे स्थायिक होण्याचा निर्णय घेतात.ङएकूणच पाहता, इतिहास, संस्कार, शिक्षण आणि सामाजिक जागरूकता यांचा संगम दापोलीला "भारतरत्नांची पुण्यभूमी" म्हणून ओळख निर्माण करून देतो. या प्रदेशाचा अभ्यास केवळ प्रादेशिक अभिमानापुरता मर्यादित नसून भारतीय समाजाच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठीही उपयुक्त ठरतो. दापोली ही केवळ भौगोलिक ओळख नाही, तर मूल्यांची, परंपरेची आणि प्रेरणेची भूमी आहे.

## सुधागडचा नवा पॅटर्न सुधागडमध्ये उबाठा आणि शिंदे गट खांद्याला खांदा लावून लढले आणि जिंकले  सुधागड सन्मान समितीच्या जोरावर प्रस्थापितांची सत्ता उलथवली

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव:राज्याच्या राजकारणात शिवसेना (शिंदे गट) आणि शिवसेना (उबाठा) यांच्यातील संघर्ष टोकाला गेलेला असताना, सुधागड तालुक्याने मात्र संपूर्ण महाराष्ट्राला धक्का देणारा एक नवा पॅटर्न समोर आणला आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत दोन्ही शिवसेनेच्या गटांनी खांद्याला खांदा लावून निवडणूक लढवली आणि प्रस्थापितांच्या सत्तेला जोरदार सुरुंग लावला. सुधागड सन्मान समितीच्या माध्यमातून आकाराला आलेल्या या प्रयोगाने भाजपसमोर मोठे आव्हान उभे करत विजयावर शिक्कामोर्तब केले.ङ सुधागडमध्ये स्थानिक राजकारणाने एक वेगळे वळण घेतले. ज्या ठिकाणी शिंदे गट आणि उबाठा गट एकमेकांसमोर उभे ठाकतील असा अंदाज होता, तिथेच या दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांनी हातात हात घालून प्रचार केला. या शिवसेना-शिवसेना युतीचा सर्वात मोठा तडाखा जांभूळपाडा जिल्हा परिषद गटात बसला. येथे शिवसेना शिंदे गटाच्या शर्मिला शरद बोडके यांनी खासदार धैर्यशील पाटील




यांच्या पत्नी नीलिमा पाटील यांचा २,९३१ मतांनी पराभव करत जायंट किलर ठरण्याचा मान मिळवला.ङ केवळ जिल्हा परिषदच नव्हे, तर पंचायत समितीमध्येही या युतीचा करिष्मा पाहायला मिळाला. परळी पंचायत समिती गणात शिवसेना (उबाठा) गटाच्या प्रणिता राजेश परदेशी यांनी भाजपच्या सुनंदा सिंदकर यांचा २,५८८ मतांनी धुव्वा उडवला. प्रणिता परदेशी यांनी ५,६८३ मते घेत विजयाचा नवा विक्रम प्रस्थापित केला. महाराष्ट्राच्या राजकारणात सुधागड पॅटर्नची चर्चा आता जोर धरू लागली आहे.ङखासदारांच्या नेतृत्वासाठी धोक्याची घंटा?ङया निवडणुकीत भाजपने राबगाव गट आणि दोन गण राखण्यात यश मिळवले असले, तरी प्रतिष्ठेच्या जांभूळपाडा गटात झालेला पराभव भाजपचे खासदार धैर्यशील पाटील यांच्या नेतृत्वासाठी धोक्याची घंटा मानला जात आहे. सुधागड सन्मान समिती, दोन्ही शिवसेना, शेकापने दाखवलेल्या या ताकदीमुळे सत्ता समीकरणाचे गणित आता पूर्णपणे बदलणार आहे.ङस्थानिक अस्मिता ङ निवडणुकीच्या सुरुवातीलाच भाजपने तालुक्याबाहेरील (पेण) उमेदवार नीलिमा पाटील यांना जांभूळपाड्यातून उमेदवारी दिल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट होती.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त 'शिवज्योत' उपक्रमाचे नववे वर्ष; रायगड किल्ला ते माणगाव शिवप्रेमींची प्रेरणादायी वाटचाल १९ फेब्रुवारीला

रायगड विशेष प्रतिनिधी
नंदकुमार चांदोरकर

महाराष्ट्राच्या इतिहासप्रेमी आणि शिवभक्तांसाठी अभिमानाचा क्षण ठरणारा 'शिवज्योत आगमन' हा उपक्रम यंदा नवव्या वर्षात पदार्पण करत आहे. स्वराज्य सह्याद्रीचा



ग्रुप तर्फे १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त रायगड किल्ला ते माणगाव असा विशेष शिवप्रेमी उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.ङशिवरायांच्या स्मृती जागृत ठेवणे आणि तरुण पिढीला आपल्या वैभवशाली इतिहासाशी जोडणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. दरवर्षी मोठ्या उत्साहात पार पडणाऱ्या या कार्यक्रमात यंदाही शिवभक्त आणि इतिहासप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे.ङकार्यक्रमाची सुरुवात ऐतिहासिक रायगड किल्ल्यावरून होणार असून समारोप माणगाव येथे होईल. या प्रवासादरम्यान शिवकालीन इतिहासाची माहिती, प्रेरणादायी संदेश आणि सामूहिक सहभागातून 'शिवज्योत' जागवण्याचा संकल्प करण्यात येणार आहे.ङया उपक्रमाचे संस्थापक अध्यक्ष सचिन पवार तसेच शिवमावळे अक्षय खरूसे, अनिकेत कांबळे, साहिल बोडेरे, रुपेश फाटक, आनंद बारगे, अभिषेक लांगे, वासुदेव गुगले आणि सर्व सहकारी शिवमावळ्यांनी सांगितले की, "शिवरायांचा इतिहास जिवंत ठेवणे आणि समाजात स्वराज्याच्या मूल्यांची प्रेरणा देणे हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू आहे."ङया ऐतिहासिक आणि प्रेरणादायी उपक्रमाकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले असून मोठ्या संख्येने शिवप्रेमी सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

## अलिबाग – रोहा मार्गावर वाहतूक कोंडी; रस्त्याच्या नूतनीकरणाचा बसतोय फटका रस्त्यावर धुळीचे साम्राज्य

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग – रोहा रस्त्याच्या नूतनीकरण आणि रुंदीकरणाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. सहाणगोठी ते सहाण बायपास आणि आरसीएफ कॉलनी कुरुळ गेट ते कुरुळ वळण या दरम्यान हे काम सुरू आहे. कंत्राटदाराने सुरू केलेले काम निश्चित गुणवत्ता पूर्ण होत असलेतरी या कामाचा फटका इयत्ता बारावीचे विद्यार्थी आणि शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना बसला आहे. या कामामुळे या परिसरात रोज वाहतूक कोंडी होत असल्याने सर्वच वाहनांना अलिबाग पर्यंत पोहचणे जिकरीचे बनले होते. एक ते दिड तास बेलकडे ते अलिबागला पोहचायला लागतो आहे. आज सकाळी अकरा वाजता इयत्ता बारावीचा पेपर होता यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहचता आले नाही. खरेतर हे काम करणाऱ्या कंत्राटदाराने वाहतूक नियोजन करण्यसाठी पोलिसांच्या वाहतूक शाखेकडे संपर्क करणे अपेक्षित होते परंतु तसे न केल्याने या वाहतूक कोंडीचा फटका विद्यार्थ्यांना बसला आहे. ङठीक ठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत ते काम संथ गतीने सुरू आहे आणि रस्त्यावर नुसती खडी, डबर, माती आणि ग्रीट यामुळे रस्त्यावर धुळीचे लोट तयार झाले आहेत, यामुळे नागरिकांना आजारांना सामोरे जावे लागत आहे. ङआज झालेल्या ट्रॅफिकमुळे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी पायपीट करत परीक्षा केंद्र गाठण्याचा प्रयत्न केला. काही विद्यार्थ्यांना उशिराने केंद्रावर पोहचता आले. यामुळे इयत्ता बारावी आणि इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा असेपर्यंत वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रायगड पोलिसांनी या रस्त्यावर चालकांच्या बेशिस्तीला लगाम घालावा अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराला परीक्षेचे गांभीर्य आहे की नाही असा सवाल संतप्त पालकवर्ग करीत आहेत.



## खेडमध्ये मंदिरातील घंटा चोरी करणारा भामटा गजाआड

खेड : खेडमध्ये मंदिरातील घंटा चोरी करणारा भामटा गजाआड  करण्यात पोलिसांना यश आले असून त्याच्याकडून रत्नागिरी, रायगड जिल्ह्यातील १६ चोऱ्यांचा उलगडा झाला आहे. पोलिसांच्या या यशस्वी कामगिरीचे कौतुक होत आहे. खेड मधील मौजे शिरगाव खुर्द शिवाजीनगर येथील काळकाई देवीच्या मंदीरात दिनांक ०३/१०/२०२५ रोजी सायंकाळी १७.३० वा. चे दरम्याने ते दिनांक ०४/१०/२०२५ रोजी अज्ञात इसमाने मंदीरामधील पितळी घंटा, सीसीटीव्ही कॅमेराचा डिव्हीआर अश्या वस्तु चोरून नेल्या म्हणून खेड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ३०५/२०२५ भारतीय न्याय संहीता कलम ३०५ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे व गोपनिय माहीतीच्या आधारे एक इसम हा वांरवार रत्नागिरी व रायगड परीसरात संशयास्पदरित्या वावरत असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तपास पथकामार्फत माहीती प्राप्त करून घेवून सदर इसम हा लोणावळा व खोपोली परीसरात असल्याचे समजले. खेड पोलीस ठाणेच्या तपास पथकाने तात्काळ तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे व गोपनिय माहीतीच्या आधारे सदर इसमाचा शोध घेऊन आरोपी १) राकेश तुळशीराम पडवकर (वय ३७ वर्षे रा.कुसगाव लोणावळा ता. मावळ जि.पुणे), २) जगलाल रामनरेश केवट (वय-५० वर्षे रा. शांतीनगर वसाहत खोपोली ता. खालापूर जि. रायगड) यांना अटक केली आहे.

सूर्योदय

मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६

संपादकीय

## संवाद

अमेरिकन प्रशासनाच्या अंदाजानुसार बांगलादेशमधील 'जमात-ए-इस्लामी' हा इस्लामिक पक्ष पुढील महिन्याच्या निवडणुकीत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी करू शकेल आणि म्हणूनच अमेरिका त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेशमध्ये 'जमात-ए-इस्लामी' या संघटनेवर यापूर्वी अनेक वेळा बंदी घालण्यात आली होती. अलीकडेच शेख हसीना यांची राजवट आरक्षण आंदोलनाला लागलेल्या हिंसक वळणामुळे उलथवून टाकण्यात आली. तिथे युनुस मोहम्मद यांचे हंगामी सरकार सत्तेवर आहे. या सत्तेच्या काळात 'जमात-ए-इस्लामी'ला अधिक महत्त्व मिळत गेले. हसीना यांच्या सरकारकडे युनूस हेही शत्रूपक्षाचे सरकार म्हणून पाहत होते. हे सरकार उलथवून टाकण्यात 'जमात-ए-इस्लामी'ची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे युनूस याच पक्षाच्या सल्ल्याने कारभार करतात आणि धोरणे ठरवतात. हाच पक्ष सत्तेवर यावा, असे त्यांना वाटते. 'जमात-ए-इस्लामी' पक्षाने पारंपरिकपणे शरिया कायद्यावर आधारित शासन आणि महिलांचे कामाचे तास कमी करण्याचा पुरस्कार केला आहे; जेणेकरून त्या मुलांप्रती त्यांची कर्तव्ये पार पाडू शकतील. तथापि, अलीकडेच त्यांनी आपली सार्वजनिक प्रतिमा सौम्य करण्याचा आणि महिलांचा पाठिंबा वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. 'जमात-ए-इस्लामी'चे प्रवक्ते मोहम्मद रहमान म्हणाले, की पक्ष भ्रष्टाचारविरोधी, पारदर्शकता, जबाबदारी आणि सुशासन या मुद्द्यावर निवडणुका लढवत आहे. महिलांसाठी कामाचे तास कमी करण्याचा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे आणि पक्षाची शरिया कायदा लागू करण्याची कोणतीही योजना नाही.

१९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान, 'जमात-ए-इस्लामी'च्या अनेक नेत्यांनी लोकांवर गंभीर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. पक्षाने वेगळ्या बांगलादेशला विरोध केला होता, कारण तो इस्लामविरोधी असल्याचे मानले जात होते. भारतात बाबरी मशीद पाडल्यानंतर, जमात नेते आणि विद्यार्थी संघटनांवर बांगलादेशमध्ये हिंदूविरोधी दंगली भडकवल्याचा आरोपही करण्यात आला होता. बांगलादेशमधील राजकीय परिस्थिती बदलत असताना तेथील अमेरिकन राजदूतांनी पुनरुज्जीवित इस्लामिक चळवळीसोबत काम करण्याची तयारी दर्शवली. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालानुसार अमेरिकेचा अंदाज आहे, की 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशच्या निवडणुकीमध्ये ऐतिहासिक यश मिळवू शकते. 'वॉशिंग्टन पोस्ट'ला मिळवलेल्या ऑडिओ रेकॉर्डिंगनुसार १ डिसेंबर रोजी बांगलादेशी महिला पत्रकारांसोबत बंद दाराआड झालेल्या बैठकीत ढाका येथे तैनात असलेल्या एका अमेरिकन राजदूताने सांगितले, की देश इस्लामिक झाला आणि १२ फेब्रुवारीच्या निवडणुकीमध्ये 'जमात-ए-इस्लामी' पूर्वीपेक्षा चांगले प्रदर्शन करेल. 'वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्रानुसार 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशवर इस्लामिक कायद्याची आपली धारणा लादण्याचा प्रयत्न करेल, या चिंतेकडे अमेरिकन राजदूताने दुर्लक्ष केले. ते म्हणाले, की जमात शरिया लादू शकते, असे मला वाटत नाही. पक्षाच्या नेत्यांनी अशी भयानक पावले उचलल्यास अमेरिका दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर शंभर टक्के कर लादेल.

'द वॉशिंग्टन पोस्ट'ला दिलेल्या निवेदनामध्ये ढाका येथील अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्या मोनिका शिया म्हणाल्या, की डिसेंबरमध्ये झालेली चर्चा ही एक नियमित बैठक होती. ही अमेरिकन दूतावासाच्या अधिकाऱ्यांची आणि स्थानिक पत्रकारांमधील 'ऑफ-द-रेकॉर्ड' चर्चा होती. त्या म्हणाल्या, की बैठकीदरम्यान अनेक राजकीय पक्षांबाबत चर्चा झाली. अमेरिका कोणत्याही एका राजकीय पक्षाला दुसऱ्यापेक्षा जास्त पसंती देत नाही आणि बांगलादेशमधील लोक निवडत असलेल्या सरकारसोबत काम करण्याची अमेरिकन सरकारची योजना आहे.

तथापि, 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालात बांगलादेशमधील अमेरिकन राजदूत एका महत्त्वपूर्ण संक्रमणादरम्यान देशाच्या राजकीय भविष्याकडे कसे पाहतात, यावर प्रकाश टाकला आहे. ढाका येथील दूतावासाच्या बैठकीत, एका अमेरिकन अधिकाऱ्याने सूचित केले, की 'जमात-ए-इस्लामी'शी संपर्क साधण्याव्यतिरिक्त मिशनचे कर्मचारी 'हेफाजत-ए-इस्लाम बांगलादेश' आणि 'इस्लामी आंदोलन बांगलादेश'सह इतर रूढीवादी गटांसोबतही काम करत आहेत. ते इस्लामिक राजकीय पक्षांमध्येही सामील होऊ शकतात. राजनयिकाने जोर देऊन सांगितले, की 'जमात-ए-इस्लामी' सत्तेत आली आणि अमेरिकेला मान्य नसलेली धोरणे लागू केली,

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

मंडणगड प्रतिनिधी

मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे संत सेवालाल महाराज जयंती शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालयाच्या शिक्षिका ज्योती राणे यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेच्या वतीने संत सेवालाल महाराज यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे शिक्षक प्रतिनिधी बसवंत शिरगिरे,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यालयाचे सहा.शिक्षक प्रमोद जाधव यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले.जयंतीचे औचित्य साधून १० विद्यार्थ्यांनी संत सेवालाल यांच्या



कार्याविषयी माहिती सांगितली.विद्यालयाचे प्राध्यापक प्रभाकर भालके यांनी सेवालाल महाराज यांचे जन्म, बंजारा समाजासाठी केलेले योगदान याविषयी माहिती सांगितली तसेच विद्यालयाचे सहा.शिक्षक- प्रकाश हेलोंडे यांनी संत सेवालाल महाराज यांचा जन्म व सामाजिक कार्य, भारतीय सामाजिक धार्मिक क्षेत्रातील एक थोर समाज सुधारक याविषयी माहिती स्पष्ट केली. विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक प्रमोद जाधव यांनी संत सेवालाल महाराज यांचा जीवनपट सांगितला. प्रशाळेचे उपमुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी यांनी संत सेवालाल महाराज यांचे मूळ गावाचे नाव, मूळ जन्म ठिकाणाचे नाव व आताच्या काळातील नावे, समाजाबद्दल असणारं प्रेम, आपुलकी,त्याग, सहनशीलता, प्रेरणा, जिद्द, संयम सामर्थ्य या गोष्टी त्यांच्याकडे होत्या.तसेच वेगवेगळ्या भाषांमध्ये समाजाबद्दलचे लिहिलेले लेखन याविषयी सखोल माहिती सांगितली कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे यांनी संत सेवालाल महाराज यांचा पेहराव वाखण्याजोगे होता तसेच हा समाज कायमचा दऱ्या-खोऱ्यात राहणारा, इतर समाजापासून वंचित ,अलिप्त असणारा समाज त्याच्यासाठी संत सेवालाल महाराजांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. तसेच ते भारतीय तत्त्वज्ञ, समाज सुधारक,अध्यात्मिक गुरु होते याबाबत माहिती प्रकट केली. शेवटी सहा. शिक्षिका ज्योती राणे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# हिंद दी चादर गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शताब्दीनिमित्त नवघर शाळेत व्याख्यान व रॅली संपन्न

प्रतिनिधी भूषण सिसोदे

गुरु तेग बहादूर साहिब यांचा गौरवशाली इतिहास नवघर शाळेत घुमला; प्रश्नमंजुषेतून विद्यार्थ्यांचा सन्मान हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आणि मानवी मूल्यांसाठी सर्वोच्च बलिदान देणारे शिखांचे नववे गुरु, गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या प्रकाश पर्व (शताब्दी महोत्सव) निमित्त नवघर शाळेत भव्य रॅली आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी गुरुंच्या जीवनकार्याचा आदर्श घेतला.ङ्कबलिदानाची गाथा: हिंद दी चादरङ्क प्रसंगी भार्जे येथील गुरुद्वाराचे गुरु श्री. बचित्तरसिंग यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गुरु तेग बहादूर साहिब यांचे बालपण, त्यांचे आध्यात्मिक जीवन आणि अन्यायाविरुद्धचा लढा यावर त्यांनी प्रकाश टाकला. औरंगजेबाच्या जुलुमाविरुद्ध त्यांनी दिलेला





लढा आणि काश्मिरी पंडितांच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान यामुळेच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारे कवच) असे का संबोधले जाते, हे त्यांनी सोप्या शब्दांत उलगडून सांगितले.ङ्कविद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा आणि बक्षिसेङ्कव्याख्यानानंतर श्री. बचित्तरसिंग यांनी सांगितलेल्या माहितीवर आधारित पाच प्रश्न विचारले. या प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना जागीच भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळाला.सर्व मुलांना पुस्तके भेट देण्यात आली.ङ्कमान्यवरांची उपस्थितीङ्कया कार्यक्रमाला रिओप्लास्टचे व्यवस्थापक सुखविंदर सिंग, तसेच गुरु बच्चन सिंग आणि श्री.राजेंद्र अंबिके, उपशिक्षक, नवघर गुरुद्वाराचे ग्रंथी ग्यानी जी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बैकर यांनी सर्व पाहुण्यांचे उत्साहात स्वागत केले.ङ्कनियोजन आणि सहकार्यङ्ककार्यक्रमाचे नेटके नियोजन उपशिक्षक श्री. राजेंद्र अंबिके यांनी केले होते. तसेच हा सोहळा यशस्वी करण्यासाठी वृषाली गुरव, शीतल पाटील, अनुजा माने आणि रुपाली लेंडवे यांनी मोलाचे सहकार्य केले. रॅलीच्या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिब यांचा शांतता आणि त्यागाचा संदेश संपूर्ण परिसरात पोहोचवण्यात आला.ङ्कगुरु तेग बहादूर यांच इतिहास व कार्य प्रेरणादायी आहे हे आजच्या बहुमोल व्याख्यान मधून समजले.

# शिवजयंती ला सरसगड दुसऱ्या प्रदक्षिणेचे आयोजन सरसगडाचा सभोवतालचा परिसर व इतिहासाची मिळणार माहिती

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव: सुधागड संघर्ष संस्था मधील तरुणांनी रायगड प्रदक्षिणा प्रमाणे सरसगड प्रदक्षिणा शिवजयंतीला गुरुवारी (ता. १९) सकाळी ६ वाजता आयोजित केली आहे. यंदाचे हे दुसरे वर्ष असून मागील वर्षी तब्बल ५२ जण या प्रदक्षिणेत सहभागी झाले होते. या प्रदक्षिणेमुळे सरसगडाच्या भोवतालच्या ऐतिहासिक व नैसर्गिक परिसराची माहिती अनेकांना मिळते. त्यामुळे या मोहिमेत सहभागी होण्यासाठी अनेकजण उत्साही आहेत. ङ्क या प्रदक्षिणेचा मार्ग खडतर आहे. साहसी, जबाबदार ट्रेकिंगप्रेमीनी अवघड आणि जिद्दी अशा अविस्मरणीय प्रदक्षिणेचा अनुभव जरूर घ्यायला हवा. मात्र अतिउत्साही व नियम न पाळणाऱ्या ट्रेकर्सने भाग घेऊ नये. असे आवाहन संस्थेर्तफे करण्यात आले आहे. ङ्क सरसगड प्रदक्षिणेचा प्राथमिक मार्ग तरुणांनी व सदस्यांनी पाहिला असून मार्गावर साफसफाई व दिशादर्शक नोंदी देखील करण्यात आल्या आहेत. ङ्क सरसगड प्रदक्षिणेसाठी रु.१००/- एव्हढी नाममात्र नोंदणी फी आकारली आहे. नोंदणीसाठी संपर्क अरविंद दंत - ९२७२०७१५३४, कपिल पाटील - ९२२६७८४२५५, अमित निंबाळकर - ९२७३७९०८५०, प्रदीप गोळे - ८०८७५६९२९२ व मिलिंद गोळे - ८४४६२८८१४२ यांच्याकडे करावा. इतर माहिती, अटी व शर्ती नोंदणी करताना दिल्या जातील. प्रदक्षिणा पूर्ण करणाऱ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. असे संघर्ष संस्थेर्तफे सांगण्यात आले. ङ्कऐतिहासिक महत्त्व आणि दुर्गम रचनाङ्कप्राचीन ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेले पाली गाव सरसगड किल्ल्याच्या कुशीत वसलेले आहे.







छत्रपती शिवाजी महाराजांनी या गडाचे महत्त्व ओळखून तो स्वराज्यात सामील केला आणि त्याच्या दुरुस्तीसाठी दोन हजार होण मंजूर केले होते. समुद्रसपाटीपासून ४९० मीटर उंचीवर असलेल्या या किल्ल्याची बांधणी दुर्गमता आणि विपूल जलसंचय यावर भर देऊन करण्यात आली आहे. दूरवर टेहळणी करण्यासाठी सरस असल्याने या किल्ल्याला सरसगड हे नाव मिळाले. किल्ल्याच्या दक्षिण बाजूला एकाच दगडात घडविलेल्या १११ पायऱ्या हे या गडाचे प्रमुख वैशिष्ट्य असून, गडाला दिंडी दरवाजा या नावाने ओळखले जाणारे मजबूत प्रवेशद्वार आणि तटबंदीचे संरक्षण आहे.ङ्कगडावरील वास्तू आणि सांस्कृतिक वारसाङ्ककिल्ल्यावर बाराही महिने स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध असलेला ३ मीटर खोल मोती हौद असून, बालेकिल्ल्याच्या पायथ्याशी असे एकूण दहा हौद आहेत. गडाच्या परिसरात घोड्याची पागा, धान्य कोठारे, शस्त्रागारे, कैदखाने आणि दारू कोठारे कोरलेली आहेत. बालेकिल्ल्यावर जोगेश्वरी (केदारेश्वर) मंदिर आणि शहापीर दर्गा असल्याने येथे धार्मिक सलोखा पाहायला मिळतो.

# जिल्हा स्तरीय चित्रकला स्पर्धेत स्वराज उध्दरकर प्रथम

द. रा. जि. उपसंपादक:
संतोष उध्दरकर

म्हसळा :श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे विभागीय जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा या शाळेतील इयत्ता ८ वी मधील विद्यार्थी कु. स्वराज संतोष उध्दरकर या विद्यार्थ्याचा प्रथम क्रमांक आला असून शाळेच्या वतीने म्हसळा पोलीस सहायक निरीक्षक रविंद्र पारखे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह निमित्ताने विविध प्रकारच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते, क्रिडा, रांगोळी, पाककला, चित्रकला



निबंध,वकृत्व, गायन अशा स्पर्धेचे आयोजन करून विजेत्या स्पर्धकांना जिल्हा स्तरावर पाठविण्यात येते,जिल्हा स्तरीय चित्रकला स्पर्धा पेण इथे पतंगराव कदम विद्यालयात घेण्यात आली असून या स्पर्धेत रायगड जिल्हयातील विविध महाविद्यालयातील अनेक विदयार्थी यांनी सहभाग घेतला होता.स्वराज उध्दरकर या विद्यार्थ्यांने जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्या बद्दल स्वराज चे सर्वत्र कौतुक होतांना दिसत आहे.य यावेळी उपस्थित म्हसळा पोलीस सहायक निरीक्षक रविंद्र पारखे,चेअरमन समीर बनकर, व्यवस्थापन अध्यक्ष महेश पवार, उपाध्यक्ष शशिकांत शिर्के, मुख्याध्यापक डि. आर. पाटील सर, सल्लागार कमिटी सदस्य सुनिल उमरठकर, केंद्र प्रमुख धामणस्कर गुरुजी, भाई बोरकर, पोलीस कॉ.अक्षय पूरी,करडे मॅडम, शिर्के मॅडम, मोरे सर, मांजरेकर सर, एकनाथ पाटील सर, तसेच सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## दापोलीत शिवाजीनगरमध्ये शिवजयंती निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन

दापोली:- दापोली येथील शिवाजीनगर येथे शिवजयंती उत्सव मंडळाच्या वतीने गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी शिवतीर्थावर जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. शिवजयंतीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी दि.१५ फेब्रुवारी रोजी आयोजित निबंध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.ङ्गउत्सवाच्या दिवशी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन आणि श्री सत्यनारायण महापुजेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांकडून लाठीकाठीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात येणार असून, त्यानंतर निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न होईल. यावेळी सातारा येथील प्रा. निरंजन फरांदे यांचे छत्रपती शिवाजी महाराज एक युगप्रवर्तक राजा या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे.ङ्गया उत्सवात जागतिक वारसा स्थळ असलेल्या सुवर्णदुर्ग किल्ला याची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे.ङ्गउत्सवाला बहुसंख्य नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र कदम आणि उदय आंब्रे यांनी केले आहे.

## प्रकाश (मामा ) निजामपुरकर यांचे दु:खद निधन

द. रा. जि. उपसंपादक: संतोष उध्दरकर.

म्हसळा: म्हसळा शहरातील मामा म्हणुन सर्वांच्या परिचयाचे असलेले प्रकाश निजामपुरकर यांचे दिनांक १४ फेब्रु रोजी रात्री दु:खद निधन झाले. मामा यांच्या निधनाने म्हसळा तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत असून तालुक्यातील अनेक मान्यवरांनी मामा यांचे अंतिम दर्शन घेतले, म्हसळा शहरातील स्मशानभुमित त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले, प्रकाश निजामपुरकर (मामा) यांनी १९७५ ते १९७७ च्या काळात लागु करण्यात आलेल्या आणीबाणी काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी निडरपणे उभे राहिले व हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून पुणे येथील येरवडा जेल, विसापूर जेल इथे नऊ महिन्याचा कारावास भोगलात त्या बद्दल महाराष्ट्र शासन कडुन मामा यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित देखील करण्यात आले होते, मामा यांच्या पश्चात त्यांना पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.




# जावेळेतील बेलेश्वराच्या चरणी भक्तीचा दरवळ; महाशिवरात्रीला हरहर महादेवचा जयघोष

श्रीवर्धन प्रतिनिधी;

श्रीवर्धन तालुक्यातील जावेळे या निसर्गरम्य गावात महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर भक्तीचा अनोखा दरवळ अनुभवायला मिळाला. गावाच्या श्रद्धास्थान असलेल्या प्राचीन बेलेश्वर मंदिर परिसरात पहाटेपासूनच ''हर हर महादेव''च्या गजराने वातावरण भारावून गेले.

पहाटे काकड आरतीने दिवसाची सुरुवात झाली आणि सूर्य उगवण्याआधीच भाविकांची पावले मंदिराकडे वळू लागली. कुणाच्या हातात बेलपत्र, कुणाच्या ओंजळीत फुले, तर कुणाच्या डोळ्यांत अपार श्रद्धा अशा भक्तिभावाने हजारो भाविकांनी स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन



घेत अभिषेक केला. सकाळी निघालेली पालखी मिरवणूक गावभर फिरताना प्रत्येक घरातून आरती, फुलांची उधळण आणि जयघोष ऐकू येत होता.

दुपारच्या महाआरतीनंतर धारेश्वर प्रसादिक भजन मंडळ यांच्या सुरेल भजनांनी मंदिर परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या भक्तीमय कार्यक्रमात सुभाष आंजर्लेकर यांनी केलेल्या शिवलिलामृत ग्रंथ वाचनाने उपस्थित भाविकांना अध्यात्मिक समाधानाची अनुभूती दिली.

महाशिवरात्री म्हणजे फक्त उत्सव नाही, तर गावाच्या एकोप्याचा, परंपरेचा आणि श्रद्धेचा जिवंत सण हे जावेळेकरांनी पुन्हा एकदा दाखवून दिले.ङ्गङ्गदरम्यान, जावेळे ग्रामस्थ महाशिवरात्री महोत्सव मंडळाच्या वतीने सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व भाविकांनी उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लोकारोग्य

१हॅलो डॉक्टर

टाईप २ मधुमेह - लक्षण,कारण आणि उपचार

सध्याची आपली प्रचंड धावपळीची,ताण तनावपूर्वक आणि चुकीच्या आहाराने भरलेली जीवनशैली पाहता,अगदी ऐन तारुण्यात किंवा अगदी बालवयात देखील अनेक प्रकारचे आजार अकाली उद्भवताना दिसू लागलेले आहेत.यामध्ये सतत कामाचा व्याप,मानसिक ताण तणाव,वेळी अवेळी चुकीच्या पद्धतीचा आहार,फास्टफुड




आणि पाश्चिमात्य शैलीच्या खाण्याकडे असलेली ओढ,शारीरिक व्यायामाचा अभाव अशा अनेक कारणांमुळे रक्तातील साखरेची पातळी वाढून मधुमेहाचा आजार अनेकांना सुरू होतो. त्यातही आपल्या देशात टाईप २ या प्रकारच्या मधुमेहिंचे प्रमाण लक्षणीय वाढताना दिसतेय.मधुमेह या आजाराचा दुष्परिणाम हा डोळे,किडनी,हृदयावर होऊन त्याच माध्यमातून इतर अवयवांवर देखील होताना दिसतोय.एकूणच, टाईप २ हा मधुमेहाचा प्रकार गंभीर आहे.मुळात,टाईप २ मधुमेह म्हणजे नक्की काय?या प्रकारच्या मदुमेहाची लक्षण काय असतात? कारण काय?आणि यावर उपचार पद्धती कोणत्या आहेत?हेच जाणून घेण्यासाठी मधुमेह विकार तज्ञ डॉ.शैलेश भोपळे यांच्याशी साधलेला संवाद.

१)टाईप २ मधुमेह म्हणजे नक्की काय?

टाईप २ मधुमेह हा एक जुनाट आजार आहे.हा आजार आपल्या चया पचयशी संबंधित आहे.आपल्या शरीराचा ऊर्जा स्त्रोत ग्लुकोज,स्वादू पिंडाडवारे तयार केलेल्या इन्सुलिन द्वारे नियोजित केला जातो.मधुमेहामध्ये इन्सुलिनच्या प्रतिकरामुळे पेशीद्वारे गलुकोजचे शोषण कमी होते.जेंव्हा पेशी इन्सुलिनला प्रतिसाद देत नाहीत,तेंव्हा स्वादुपिंड अधिक प्रमाणात इन्सुलिन तयार करतो आणि रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात येत नाही.याला टाईप २ प्रकारचा मधुमेह अस आपण म्हणतो.

२)टाईप २ प्रकारच्या मधुमेहाची लक्षण कोणती आहेत?

टाईप २ मधुमेही रुग्णांना सतत मूत्र विसर्जनाची समस्या उद्भवते,प्रचंड शारीरिक थकवा आणि अशक्तपणा जाणवतो.अशा रुग्णांना वारंवार तहान लागते,दृष्टीची समस्या उद्भवते,शरीरावर जखमा झाल्या की त्या लवकर भरून येत नाहीत.अशा रुग्णांच्या हातापायांना मुंग्या येतात,शिवाय त्यांच्या वजनात सतत कमी जास्त घट होत असते.सर्वसाधारण पणे ही टाईप २ प्रकारच्या मधुमेहाची लक्षण असतात.

३)टाईप २ प्रकारच्या मधुंमेहाची कारण काय आहेत?अनेकदा अशा प्रकारचा मधुमेह हा आनुवंशिक पद्धतीने आई,वडील,काका किंवा आपल्या नातेवाईकांना असेल तर तो पुढल्या पिढीला देखील होऊ शकतो.परंतु,वजन वाढणे,लठ्पणा,तेलकट,तुपकट,खाणे,झटपट मिळणार फस्टफुड अशा खाण्यामुळे वजन वाढते आणि पर्यायाने रक्तातील साखरेचे प्रमाण देखील वाढते.याशिवाय सर्वात महत्वाचे कारण म्हणजे शारीरिक श्रमाची कमतरता किंवा अभाव हे देखील आहे.प्रचंड ताण तणाव,सतत मानसिक ताण यामुळे शरीरातील रक्तातील साखरेची पातळी वाढते आणि मधुमेह आजार उद्भवतो.

४)या आजारावर उपचार काय आहेत?

टाईप २ या प्रकारच्या मधुमेहाची सुरवात झालेली असेल तर सर्वात महत्वाचं म्हणजे अचूक निदान केल्यानंतर डॉकटर जी औषध सुचवतात ती नियमित घ्यावीत.दररोज ग्लुकोज मीटर द्वारे सकाळी नाष्ट्यानतर,दुपारी जेवणानंतर आणि संध्याकाळी देखील गलुकोजचे प्रमाण मोजाव.नियमित शारीरिक व्यायाम करायलाच हवा.तळलेले,मसालेदार पदार्थांचे सेवन एकदम बंद करावं.मद्यपान,धूम्रपान टाळावं,आहारात पालेभाज्या,मोसमातील ताजा फळांचा समावेश असावा,आहार हा साधा आणि सात्विक असावा ज्यामध्ये भात,बटाटा,अशा पिष्टमय पदार्थांचा अगदी कमीत कमी समावेश असावा,आणि योग्य डॉकटर असतील त्यांचेकडून नियमित रक्तातील साखर तपासून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य त्या सूचनाच पालन करावं.

२ जनआरोग्य

जागतिक कर्करोग दिनाच्या स्मरणार्थ, इल्युमिनेट ३.० चे आयोजन

जागतिक कर्करोग दिनाच्या स्मरणार्थ, इल्युमिनेट ३.० एक ऑन्कोलॉजी लीडरशिप टाउनहॉल ३.० चे आयोजन डॉ. शिवंती लिमये, संचालक मेडिकल अँड प्रिसिजन ऑन्कोलॉजी, सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल, यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. तीन दिवसीय बहुविद्याशाखीय ऑन्कोलॉजी संगोष्ठी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये प्रिसिजन ऑन्कोलॉजी, डायग्नोस्टिक्स, इम्युनोथेरपी, सेल्युलर थेरपी आणि उदयोन्मुख कर्करोग लसींमधील प्रगतीवर चर्चा करण्यासाठी आघाडीच्या जागतिक आणि भारतीय ऑन्कोलॉजी तज्ञांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. शिवांती लिमये यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली. त्यांनी संदर्भ मांडला आणि त्यानंतर अभ्यासपूर्ण मुख्य चर्चासत्र झाले. जागतिक ऑन्कोलॉजी इकोसिस्टममधील प्रमुख नावे, जसे की डॉ. वाफिक एल डेरी आणि डॉ. बेन वेस्फलेन, सहभागी झाले. उद्घाटन टप्प्याचा एक भाग म्हणून, ज्येष्ठ चित्रपट निर्माते आणि कर्करोग वाचलेले श्री. राकेश रोशन यांनी इल्युमिनेट ३.० मध्ये उपस्थिती दर्शविली आणि कर्करोग तज्ञांना पुरस्कार प्रदान केले, कर्करोगाच्या काळजीतील त्यांच्या सेवेची आणि योगदानाची दखल घेतली.दिवसभरातील चर्चांमध्ये प्रिसिजन ऑन्कोलॉजी, ब्रेस्ट ऑन्कोलॉजी, पेडियाट्रिक ऑन्कोलॉजी, ॲडल्ट हेमेटो-ऑन्कोलॉजी आणि यासह कर्करोगाच्या अनेक शाखांवर चर्चा झाली आणि - सेल थेरपी, प्रगत इम्युनोथेरपीटिक्स, प्रिसिजन ऑन्कोलॉजी आणि उदयोन्मुख कर्करोग लसी यासारख्या महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला

३ ओळख वैद्यक उपकरणांची

सोनोग्राफी

सोनोग्राफी हे उच्चगामी ध्वनीलहरींच्या गुणधर्मांचा वापर करून शरीराच्या अंतर्गत अवयवांचे चिरफाड न करता अवलोकन करणारे तंत्र आहे. या तंत्रामुळे जटील तसेच नाजुक रचना असलेले अवयव मांसपेशी, सांधे, स्नायू यांचे सहजपणे अवलोकन करून निदान करणे शक्य झाले आहे. पण मुख्यतः सोनोग्राफी तंत्राचा वापर गर्भावस्थेतील भृणाची वाढ, व्यंग यांचे अचुक निदान अर्भक जन्माला येण्यापूर्वीच करता यावे, या उद्देशाने केला जातो.त्याचप्रमाणे स्त्रीरोगांवर निदान व उपचार करणे या तंत्रज्ञानामुळे सोपे झाले आहे.सोनोग्राफी तंत्रात १ ते १८ मेगाहर्ट्झ्? इतकी कंप्रता असलेल्या अशा उच्चगामी ध्वनीलहरींचा वापर होतो. ट्रांसड्युसर हा प्रोबचे कार्य करतो, त्वचेवर टेकवला असता उच्चगामी ध्वनीलहरींचे तो शरीरात प्रक्षेपण करून परावर्तित लहरींचे ग्रहण करून संगणकाला पाठवत असतो. संगणक त्याच्या साहाय्याने प्रतिमा निर्माण करतो. या तंत्रज्ञानामुळे प्रत्यक्ष दिसु न शकणाऱ्या ठिकाणावरून प्रतिमा निर्माण करता येतात.सोनोग्राफी हे एक प्रसुतीपुर्व वैद्यकीय तपासणीपैकी एक तपासणी आहे. ध्वनिलहरी, क्ष किरणांपेक्षा खूपच सौम्य असल्याने यांचा त्रास गर्भाला अजिबात होत नाही. म्हणूनच गर्भाची वाढ, गर्भाचे रोग, गर्भधारणा यांचा पूर्ण अभ्यास कितीही वेळा करता येऊ शकतो.पोटातील किंवा उदरपोकळीतील अवयवांचा प्रत्यक्ष न पहाता तपासणी करणे.स्त्रियांमधील वंध्यत्व (इनफर्टिलिटी) मध्ये त्यांच्या गर्भाशयाचा व नलिकांचा अभ्यास - व्यतिरिक्त बिजांडामधील बिजांची वाढ व बीजधारणा (ओव्हयुलेशन स्टडी) यांचा अभ्यास केला जातो. यामध्ये स्पेशल प्रोब (टी.व्ही.) हा योनी मार्गात घातला जातो. यामुळे बिजे स्वच्छ व स्पष्ट दिसतात.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## शिवसेने तर्फे शालेय विद्यार्थ्यांना मोफत कॉलरशिप पुस्तकांचे वाटप

पनवेल प्रतिनिधी
सुनील जाधव



नवी मुंबई,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ६१व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन पनवेल मधील महानगर पालिका दगडी शाळा येथे ४थी व ७वी च्या विद्यार्थ्यांना मोफत कॉलरशिप पुस्तकांचे वाटप करण्यांत आले. मनपा शाळेतील गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक सक्षमते अभावी ईतर परीक्षा देताना अडचणी निर्माण होतात त्यामुळे ते परीक्षा देवु शकत नाही.त्यांना स्कॉलरशिप सारख्या परीक्षा देताना आवश्यक पुस्तके मिळाल्यास विद्यार्थी चांगला अभ्यास करुन स्कॉलरशिप परीक्षा उत्तीर्ण होवु शकतात.ही विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेवुन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राहुल गोगटे यांच्या पुढाकाराने अगदी मोफत पुस्तकांचे वाटप करण्यांत आले.या प्रसंगी शाळेतील शिक्षक वर्गाने सदर उपक्रमा बद्दल आभार मानले.

## गृहमंत्री योगेश कदम यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत मंडणगड मधील विजयी शिलेदारांचे अभिनंदन केले

मंडणगड प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदय नामदार श्री योगेश दादा कदम यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत मंडणगड तालुक्यातील विजयी झालेल्या शिवसेनेच्या सर्व विजयी शिलेदारांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.ङ्गङ्गरत्नागिरी जिल्हा सहसंपर्क प्रमुख आदेश केणे ,मंडणगड शिवसेना तालुका प्रमुख रत्नागिरी जिल्हा परिषदेचे सदस्य श्री प्रताप दादा घोसाळकर ,शिवसेना तालुका संघटक अनंत लाखण शिवसेना तालुका समन्वयक जितेंद्र दवंडे, शिवसेना उपतालुका प्रमुख रामदास रेवाळे ,जिल्हा परिषदेच्या सदस्या सौ अस्मिता ताई केंद्रे, विभाग प्रमुख ईरफान भाई बुरोंडकर ,विभाग प्रमुख आनंद भाटे ,विभाग प्रमुख संजय शेडगे विभाग प्रमुख ,पं स सदस्य दिपक मालुसरे ,पं स सदस्य अनिल रटाटे पं स सदस्या ,सौ प्रणाली ताई चिले पं स सदस्या ,सौ दिप्ती ताई घडशी ,माजी पं स सदस्य नितीन म्हामूणकर विभाग संघटक निलेश रक्ते ,शहर प्रमुख गटनेता विनोद जाधव ,नगरसेवक योगेश जाधव ,उद्योजक संदेश चिले ,कार्यालय प्रमुख संतोष पार्टे ,महिला उपतालुका संघटक सौ सुप्रिया ताई धोंडगे ,उपविभाग प्रमुख दयानंद येसरे ,भूपेंद्र बोर्ले ,उद्योजक दिपकशेठ घोसाळकर ,युवासेना उपतालुका अधिकारी देविचंद गणवे ,वसिम चिपोळकर ,प्रकाश महाडिक तसेच सर्व शिवसैनिक उपस्थित होते.



## कर्मवीर दादा इदाते कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता १२ वीचा शुभेच्छा समारंभ संपन्न

मंडणगड (प्रतिनिधी) दि. :सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे कर्मवीर भि. रा.तथा दादा इदाते वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता १२ वर्गातील विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर होते तर संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. रविंद्रकुमार मिश्रा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. विष्णु जायभाये, प्रा. अशोक कंठाळे, प्रा. महादेव वाघ, प्रा. प्राची कदम, प्रा. रिदा चिमावकर, प्रा. संजना दिवेकर, ग्रंथपाल डॉ. दगडू जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. ङ्गकार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थेचे प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी प्रा. महादेव वाघ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयामध्ये मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करुन विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेकरीता शुभेच्छा दिल्या. यानंतर यावेळी सुधीर भोसले, महिनूर सय्यद, महेक खलपे आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, तसेच प्रा. प्राची कदम यांनीही आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. ङ्गयावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर यांनी सांगितले की, विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असून त्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी संस्था-व्यवस्थापन, महाविद्यालय प्रशासन, शिक्षक व पालक या चारही घटकांची असते. त्यामुळे या सर्व घटकांचा मान, सन्मान, प्रतिष्ठा इत्यादी बाबी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर अवलंबून आहेत. हे जाणून विद्यार्थ्यांनी येणा-या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करून महाविद्यालयाच्या लौकिकामध्ये भर टाकावी. आपल्या महाविद्यालयात पदवी शिक्षणाचीही उत्तम सुविधा उपलब्ध असून पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी याच महाविद्यायात उच्च शिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी इयत्ता १२ वी वाणिज्य वर्गातील प्रतिनिधीक विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने पुष्प देवून परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूचत्रंचालन प्रा. प्राची कदम यांनी केले तर आभार प्रा. महादेव वाघ यांनी मानले.



## मोहन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आकले येथील सन १९९८ -९९ बॅच मधील मित्रांनी केला मित्राचा सत्कार

उपसंपादक प्रदीप पवार.

चिपळूण तालुक्यातील आकले येथील मोहन विद्यालयातील दहावीमध्ये एकत्र शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील एक सहकारी मुंबई विद्यापीठ संचलित व महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासन पुरस्कृत विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आंबवडे येथे माहिती तंत्रज्ञान विभागात विभागप्रमुख म्हणून डॉ. राजेंद्र राऊत कार्यरत आहेत. आपल्या मित्राची ही अभिमानास्पद बाब लक्षात घेऊन डॉ. राजेंद्र राऊत यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विशेष बाब म्हणजे डॉ. राऊत यांनी संगणकशास्त्र विषयामध्ये “ ” या विषयावर पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल सर्व मित्रांनी एकत्र येऊन या आपल्या मित्राचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन यथोचित गौरव केला. या स्नेहमेळाव्याच्या प्रसंगी जुन्या आठवणींना उजाळा देत सर्वांनी एकमेकांशी संवाद साधला व भविष्यातही अशीच मैत्री टिकवण्याचा निर्धार व्यक्त केला. आपल्या मित्राच्या या सोहळ्यासाठी सतीश सकपाळ, डॉ.अभिजित दुधाळ, सचिन पवार, इकबाल चिपळूणकर, संतोष जाधव, प्रतिक्षा शिंदे, राकेश साळुंखे यांनी आयोजन केले. सदर सोहळा चिपळूण येथील हॉटेल आरंभ याठिकाणी संपन्न झाला. या प्रसंगी सर्व मित्र एकत्र आल्याबद्दल व चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल समाजसेवक विनेश भाऊ मोहिते यांनी सर्वांचे आभार मानले.



## सुशिला सकपाळ यांचे वृद्धापकाळाने निधन

सहसंपादक-: नारायण म्हात्रे

नागोठणे (खडकआळी) येथील रहिवासी तसेच नागोठणे पत्रकार संघाचे सहसचिव मनोहर सकपाळ यांच्या मातोश्री सुशिला दयाराम सकपाळ यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने गुरुवार १२ फेब्रुवारी रोजी रात्री १०.३० वाजता निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. च्या दरम्यान अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा मनोहर सकपाळ व तीन विवाहित मुली, सून, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रिया विधी शनिवार २१ फेब्रुवारी रोजी उध्दर-पाली याठिकाणी तर उत्तरकार्य (तेरावे) मंगळवार २४ फेब्रुवारी रोजी नागोठणे (खडकआळी) येथे राहत्या घरी होतील अशी माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली.

## कर्जत उल्हास नदी शेजारील राजमाता जिजाऊ माता शिवसृष्टीतील दुरावस्थेबाबत मनसेचे निवेदन सुपुर्द

कर्जत, दि. १६ फेब्रुवारी , (जयेश जाधव) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कर्जत शहर अध्यक्ष प्रसन्न बनसोडे यांनी कर्जत नगर परिषद हद्दीतील उल्हास नदी शेजारील राजमाता जिजाऊ माता शिवसृष्टीतील झालेल्या दुरावस्थेबाबत कर्जत मुख्याधिकारी यांना निवेदन सुपूर्द करण्यात आले.ङ्ग या दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शिवसृष्टीतील पुतळ्यांचे नुकसान, मावळ्यांच्या हातातील गायब तलवारी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिल्पावर उगवलेले रोप तसेच जिजाऊ उद्यानाच्या मोडकळीस आलेल्या नामफलकाची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.शिवजयंतीपूर्वी आवश्यक दुरुस्ती न झाल्यास ही बाब कर्जत शहरासाठी लाजिरवाणी ठरेल, असा इशाराही मनसेकडून देण्यात आला आहे.ङ्ग यावेळी मनसे रायगड जिल्हा सचिव अक्षय महाले, कर्जत तालुका सचिव प्रदीप पाटील, महिला सेना तालुका सचिव भारती कांबळे, कर्जत शहर सचिव हेमंत ठाणगे कर्जत शहर संघटक राजेश साळुंखे, माजी नगरसेवक धनंजय दुर्गे, उपशहर अध्यक्ष अजित राऊत, कर्जत शहर मनसे विद्यार्थी सेना अध्यक्ष अवधूत अत्रे उपशहर अध्यक्ष विनीत म्हात्रे, विभाग अध्यक्ष सुशांत चव्हाण गणेश साळुंखे, सुधीर पालकर, संदेश काळभोर आदी पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.



भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )